# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २८/०६/२०२४

## दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. २१५/२४कलम ३२४,३४, ५०४ भादवी | अमरावती | दि.२७/०६/२४ चे २२.३० वा.<br>दि. २८/०६/२४ चे ०२.३१ वा. | एक महिला | १) मंगेश काळबांडे वय २७ वर्ष<br>२) अविनाश श्रीरंग काळबांडे वय ५० वर्ष<br>दोन्ही रा. नरेश अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांचे वडीलाचे पोटे ते कठोरा बु. रोडवर सिमेंट चे गोडावुन आहे. फिर्यादी हि वडीलांच्या व्वसाय मध्ये मदत करते. नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पावसामुळे सिमेंट चे ट्रक हे रोडवर लावत असतांना यातील आरोपी क्र. १ याचा गोडावुन च्या समोर पानठेला असुन माझ्या पानठेल्याजवळ ट्रक लावु नको वरुन फिर्यादी यांनी त्यास म्हटले की अर्धा तासाकरीता ट्रक उभे करते नंतर जागा पाहुन ट्रक लावतो तर आरोपी हा दारु पिऊन होतो  आणि  फि. ला शिवीगाळ करत असता  आवाज ऐकुन फि. चे वडील सुध्दा  तेथे आले आरोपीस समजवत असतांना आरोपी ने त्याच्या पानठेल्या मधुन लोखंडी पाईप काढुन फि. चे उजव्या हातावर मारल्याने मार लागला आहे. व नाकावर भुक्की मारली असता फि. चे नाक फुटुन रक्त वाहु लागले तसेच आरोपी क्र. २ याने फि. ला पाठीवर हाता बुक्क्यांनी मारहान केली. अशा फि. चे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. २१६/२४कलम ३२४,३४ भादवी | नरेश टाऊनशिपक ठोरा बु. अमरावती | दि.२७/०६/२४ चे २२.३० वा.<br>दि. २८/०६/२४ चे ०३.४७ वा. | अविनाश श्रीरंग काळबांडे वय ५० वर्ष रा. करवा लेआऊट कठोरा बु. रोड अमरावती | १) सोनु गुप्ता वय अं. ५० वर्ष<br>२) एक महिला<br>दोन्ही रा.. अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फि. हे पत्नीसोबत रोडवर फिरण्याकरीता निघाले असता त्यांचा पुतण्या नामे मंगेश अशोकराव काळबांडे वय ३७ वर्ष यांचे रोडवर ट्रक लावण्याच्या कारणावरुन नमुद आरोपी सोबत भांडण सुरु होते  तर फि. हे भांडण सोडविण्याकरीता मधात गेले असता दोन्ही आरोपी ने फि. च्या पोत्नीस लोटलाट केली व आरोपी क्र. १ याने फि. ला काठीने डोक्यावर उजव्या बाजुस मारले त्यामुळे उजव्या कानातुन व डोक्यातुन रक्त निघाले तसेच आरोपी क्र. २ हिन फि. ला छातीवर लाथा बुक्क्यांनी मारहान केली. अशा फि. चे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोस्टे फ्रेजरपरा अप क्र ५८३/२४ कलम ४६१, ३८० भादंवि | यशोदा नगर चौक येथील लोणारे चिकन शॉप अमरावती | २७.०६.२४ रोजी रात्री १०.०० वा ते २८.०६.२४ चे ०८.३० वा दरम्यान<br>दा ता वेळ<br><br>२८.०६.२४ चे १४.०९ वा | पवन बबनरावजी लोणारे वय ३६ वर्ष व्यवसाय चिकन शॉप रा बेलपुरा अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नेहमीप्रमाणे सकाळी ०८.३० वा दरम्यान त्याचे चिकन शॉप चे दुकान उघडायला गेले असता फि ला त्याचे दुकानाचे शटर चे डाव्या बाजुचे लॉक तुटलेले दिसले फि ने शटर उघडुन दुकानात गेले असता दुकानातले काऊटर उघडुन दुकानात पाहले असता व्यापाराला देण्यासाठी ठेवलेले नगदी ९०,०००/- रुपये व चिल्लर पैसे दिसुन आले नाही त्यामध्ये ५०० रु चे १०० नोटाचे बंडले ५०,०००/-रु चे , २०० रु चे नोटाचे बंडल २०,०००/- रु, १०० रु चे नोटाचे बंडल १०,०००/- रु व चिल्लर १०,०००/-रु असा एकुण ९०,०००/- रुपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला दुकानात पैसे असल्याबाबत फि ला व फि चे दुकानात काम करणा-या मुलाला रोशन मुकेश लोहारे यांना माहीती होती त्याने चोरी केली असावी असा संशय आहे अशा फिर्यादीचे रिर्पोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा ५८२/२० २४ कलम २८९, ५०४ | अमरावती | दि २८/०६/२०२ ४ रोजी सकाळी ०८/००वा दरम्यान<br><br>दा ता वेळ दि.२८/०६/२० २४ चे १३/३६ वा | एक महिला | एक महिला | हकीकत अशाप्रकोर आहे की, यातील फिर्यादी हे चे घरा शेजारी आरोपी चे घरी तीने कुत्रा पांढ रंगाचा लाल रंगाचे ठिपके असलेला बरेच दिवसापासुन हिस्सर झाला आहे तो कुत्रा मोहल्यातील लोकांना चावा घेतो मोहल्यातिल लोकांनी वेळोवळी कुत्रा मालक हिला आपला कुत्रा बांधुन ठेवुन त्याचेवर नियंत्रण ठेवण्याबाबत सांगितले असता ती महीला आपल्या कुत्र्याला न आवरता खुले सोडुन देते नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि हे घराजवळील गार्डन मध्ये चक्कर मारुन घरी परत जात असताना तिचे घरासमोर उभी होती त्यावेळी तिचा पाळीव कुत्रा हा फि चे अंगावर धावुन आला व फि चे उजव्या पायाचे पोटरीवर चावा घेतला त्यामुळे जखम होवुन रक्त निघाले त्यावेळी आरोपी महिला तेथेच उभी होती परतु तिने कुत्र्याला आवरण्याचा कुठल्याच प्रकारचा प्रयत्न केला नाही उलट फि ला शिवीगाळ करीत मी काय करु शकते असे उलट उत्तर दिले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोटवरुन सदरचा गुन्हा दाखल |